दिव्यांग महिला व बालके यांना समान संधी मिळून समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याच्या अनुषंगाने महिला धोरण २०१४ व बाल धोरण २०१४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत सूचना.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१६२/का-२,

नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ३० जुलै, २०१९

प्रस्तावना :-

मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल रीट याचिका क्र.११६/१९९८ या न्यायालयीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ७.५.२०१९ च्या आदेशाच्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे अनुपालन होणे आवश्यक आहे. महिला व बाल विकास विभागाकडून महिला धोरण २०१४ व बाल धोरण २०१४ जाहिर करण्यात आलेले आहे. सदर धोरणामध्ये दिव्यांग महिला तसेच दिव्यांग बालके यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणताना समान संधी उपलब्ध करून देणेबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतूदींची अंमलबजावणी विविध प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय आस्थापनांशी संबंधीत आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४ व ५ मधील तरतूदींचे पालन होण्याकरिता उपरोक्त महिला धोरण व बाल धोरणातील तरतूदींची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संबंधित विभाग तसेच जिल्हा स्तरावर सूचना निर्गमीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

महिला व बाल विकास विभागाकडून महिला धोरण २०१४ जाहिर करण्यात आलेले आहे. सदर धोरणामधील प्रकरण क्र.१९ हे दिव्यांग महिलांशी संबंधीत आहे. तसेच दिव्यांग महिलांना समानतेची वागणूक देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदर महिला धोरणांतर्गत आवश्यक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये दिव्यांग महिलांच्या काळजी,संगोपन, पुनर्वसन, व्यवसाय शिक्षण, जनजागृती या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.त्यानुसार या बाबींशी संबंधीत विभागांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

२. त्याचप्रमाणे महिला व बाल विकास विभागाकडून बाल धोरण २०१४ जाहिर करण्यात आले आहे. सदर बाल धोरणातील प्रकरण क्र.५ मध्ये, शारिरीक व मानसिक दौर्बल्य असणा-या बालकांच्या आरोग्य, शिक्षण व विकास या संदर्भात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये अशा बालकांमधील क्षमतांचा विकास करणे तसेच त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही याबाबत दक्षता घेणे तसेच मुख्य प्रवाहातील कार्यक्रमांमध्ये या बालकांचा समावेश करणे तसेच त्यांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे या बाबींचा समावेश आहे. तसेच या धोरणातील प्र.क्र.७.६ अंतर्गत, सर्व बालकांच्या आणि विशेषत: विशेष गरजा असलेल्या बालकांच्या विकासासाठी तसेच त्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधांसाठी आवश्यक त्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. याची अंमलबजावणी संबंधीत विभागांनी करावयाची असून या बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे यासाठी विशेष दक्षता घ्यावयाची आहे.

३. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम , २०१६ मधील कलम ४ व ५ चे अनुपालन होणेसाठी दिव्यांग महिला व बालक यांचे संदर्भात उपरोक्त धोरणातील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने या धोरणातील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत तसेच आवश्यक तेथे धोरणात्मक निर्णय घेणेबाबत सर्व संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करावी.

४. सदर महिला धोरण २०१४ व बाल धोरण २०१४ यांची प्रत महिला व बाल विकास विभागाच्या www.womenchild.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७३०१४५८१३३६३० असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Smita Dattatray
Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c1693 4e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd 9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.07.30 15:10:06 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
३. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
४. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
५. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
६. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास
७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
८. निवड नस्ती, का-२.